किशोरवयीन मुलांच्या सर्वांगीण विकासातील निवडक घटकांवर जीवन कौशल्य कृती कार्यक्रमाचा परिणाम : एक अभ्यास
(विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मानव्यविद्या शाखेअंतर्गत शिक्षणशास्त्र विषयातील पीएच.डी. पूर्व संशोधन आराखडा

संशोधक विद्यार्थी

अविनाश रंगनाथ देसाई

संशोधक मार्गदर्शक

डॉ. केशव वा. इंगोले

एम.कॉम., एम.ए., (इंग्रजी, मराठी, इतिहास)

एम.एड., सेट, पीएच.डी., एल.एल.बी., एम.बी.ए.

प्राचार्य, राष्ट्रमाता अध्यापक विद्यालय, लोहा

ता. लोहा जि. नांदेड

संशोधन केंद्र

शिक्षणशास्त्र संकूल

स्वा.रा.ति.म.विद्यापीठ, नांदेड

जुलै : २०२२

प्रस्तावना

समकालीन स्थितीमध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीमध्ये झपाट्याने बदल होत आहेत. या बदलांमुळे विद्यार्थी गोंधळून गेलेला दिसतो. तसेच पालकांच्या आणि शिक्षकांच्या मोठ्या अपेक्षांच्या ओझ्याखाली विद्यार्थी दडपला गेला आहे. त्यामुळे स्वतःला समजून घेण्याची क्षमता विकसित होण्यास त्यास अडसर निर्माण होत आहे. व्यक्तिचा सर्वांगीण विकास करणे हे शिक्षणाचे अंतीम उद्दिष्टे मानले जाते. त्या सर्वांगीण विकासामध्ये मानसिक क्षमतांचा जास्तीत जास्त उपयोग करून शिक्षण अधिकाधिक जीवनकेंद्रीत करून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधता येतो. व्यक्तिविकास हा चारित्र्यनिर्मितीशी निगडित असतो. चारित्र्याची उत्तमप्रकारे जडणघडण होण्यासाठी मानवाला महत्त्वपूर्ण जीवन कौशल्यांची आवश्यकता आहे. म्हणूनच जीवन कौशल्यांचा विकास शिक्षणातून होणे गरजेचे आहे. यास मानसशास्त्रीय कौशल्य म्हणूनही ओळखले जाते.

जागतिक आरोग्य संघटनेने १९९९ मध्ये दहा जीवन कौशल्यांचा पुरस्कार केला यामध्ये. व्यक्तीची स्वतःच्या शारीरिक व मानसिक अवस्थांची जाण असण्याची क्षमता म्हणजे स्व ची जाणीव. या क्षमतेमुळे व्यक्तीला स्वतःच्या आवडी-निवडी, भावना व वृत्ती यांच्याबद्दल स्पष्टपणे विचार करता येतो. तसेच व्यक्तीला आपल्या जीवनाचा व अस्तित्त्वाचा खरा अर्थ समजून येतो. दूसऱ्या भूमिकेतून शिरण्याची क्षमता अथवा दुसऱ्या व्यक्तीस तिच्या दृष्टिकोनातून जाणून घेण्याची प्रामाणिक जिज्ञासा म्हणजे समानानुभूती. म्हणजेच दुसऱ्या व्यक्तीच्या ठिकाणी आपण आहोत असे समजून तिचा दृष्टिकोन जाणून घेण्याची कुवत होय. एकंदरीत निर्णयक्षमता ही अशी प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये व्यक्ती किंवा व्यक्तीगत एखाद्या प्रसंगाच्या किंवा समस्येच्या संदर्भात माहिती गोळा करतो. मिळालेल्या माहितीचे पृथकरण करून योग्य

पर्यायाची निवड निश्चित करतो. व्यवहार्य दृष्टिकोनातून पाहता योग्यवेळी निर्णय घेणे अत्यंत महत्त्वाचे कौशल्य आहे. ते जीवनाच्या दर्जावर मोठ्या प्रमाणावर परिणाम करते. जीवन कौशल्य शिक्षणासाठी हे मूलभूत कौशल्य आहे.

संशोधन समस्या

संशोधन कार्यात समस्येला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. क्षेत्र कोणतेही असो मग ते कृषी, आरोग्य, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, वैज्ञानिक, भौगोलिक, अवकाश, भूर्गभ इत्यादीमध्ये संशोधन समस्या केंद्रस्थानी असते. संशोधन समस्या निश्चित केल्याशिवाय संशोधन कार्य करणे अशक्य असते. संशोधनाच्या पायऱ्यांमध्ये समस्या ही प्रथम पायरी आहे. त्यामुळे संशोधकाला संशोधन करण्यासाठी सर्वात अगोदर संशोधन ससस्या निवडणे आवश्यक असते. परंपरागत चालत आलेल्या शैक्षणिक मूल्य समकालीन स्थितीमध्ये निरूपयोगी होताना दिसून येत आहेत. त्यामुळे माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये कौशल्य शिक्षणाला अतिशय महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते. त्यामुळेच “किशोरवयीन मुलांच्या सर्वांगीण विकासातील निवडक घटकांवर जीवन कौशल्य कृती कार्यक्रमाचा परिणाम : एक अभ्यास” हा विषय संशोधनासाठी निवडण्यात आला आहे.

संशोधनाचे महत्त्व

संशोधन विषयांचे महत्त्वाचे विविध पैलू खालीलप्रमाणे मांडण्यात आले आहेत.

१. व्यक्तींमध्ये असलेल्या आंतरिक शक्ती, गुणवैशिष्ट्यांची जाणीव आणि आवश्यकतेनुसार त्यांच्यात बदल घडवून येण्यास जीवन कौशल्य महत्त्वपूर्ण आहे.

२. दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणी व समस्या यांवर विचारपूर्वक निर्णय घेऊन त्यांमधून यशस्वी मार्ग काढण्यासाठी महत्त्वाचे असते.
३. माहिती, ज्ञान, इतरांचे चांगले विचार आत्मसात करून त्यानुसार स्वतःचे मत बनविण्यास जीवन कौशल्य मार्गदर्शक ठरतात.
४. परिसरातील घटना, कृती, प्रसंग इत्यादींबाबत सहज व विचारपूर्वक निर्णय घेणे, ताणतणावविरहीत जीवन जगता येण्यासाठी क्षमता वृद्धिंगत होणे आणि तर्क आणि निष्कर्ष काढण्यासाठी जीवन कौशल्य प्रभावी ठरतात.

संशोधनाचे उद्दिष्टे

संशोधन समस्येच्या विधानाविषयी थोड्याफार प्रमाणात गोंधळ निर्माण होऊ शकतो. अशा प्रकारचा गोंधळ टाळण्यासाठी संशोधन समस्येचे नेमक्या शब्दात प्रतिपादन होणे गरजेचे असते. हा नेमकेपणा संशोधन प्रश्न, उद्दिष्टे परिकल्पना तसेच कार्यात्मक व्याख्यांच्या लिखाणाने येतो. उद्दिष्टे संशोधकाला आणि प्रतिसादकाला जास्त सुस्पष्टता देतात. संशोधनाचा पाया उद्दिष्टे आहे. त्यामुळे ते संपूर्ण संशोधन प्रक्रियेला मार्गदर्शक ठरतात. उद्दिष्टांची यादी फारच लहान किंवा फारच मोठी नसावी. उद्दिष्टांच्या स्पष्टतेतून संशोधक नेमके काय शोधणार आहे याचे दिग्दर्शन होते. कोणतेही संशोधन हाती घेत असताना संशोधक काही प्रश्नांवर भर देतो. संशोधक प्रश्नांची रचना वाक्यानुसार करतो. काही संशोधक उद्दिष्टांनाच प्रश्नरूपाने मांडतात असे करणे टाळले पाहिजे. त्यामुळे उद्दिष्टांची पुनः पुन्हा मांडणी होते.

अभ्यासाच्या स्वरूपावरून संशोधक परिकल्पनेची मांडणी व रचना करतो. परिकल्पना या पूर्वी झालेल्या सैद्धांतिक रचनेतून उगम पावतात. संशोधक पूर्वी झालेल्या संशोधन कार्याच्या अनुषंगाने परिकल्पनांचे स्वरूप निश्चित करू शकतो. त्यामुळे संशोधकास संशोधन परिकल्पना लिहिणे शक्य होते. परिकल्पनेच्या

मांडणीवरून संशोधकास त्या क्षेत्रातील पुरेसे ज्ञान आहे हे समजते तसेच माहिती संकलन आणि विश्लेषण करण्याची दिशाही समजते. त्यामुळे परिकल्पना ही परिक्षणक्षम असावी, स्पटीकरणक्षम असावी आणि दोन चलांतील सहसंबंध दर्शविणारी असावी. प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी संशोधनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली होती.

१. हिंगोली जिल्ह्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमिचा आढावा घेणे.
२. जीवन कौशल्य कृती कार्यक्रमांची संकल्पना स्पष्ट करणे.
३. जीवन कौशल्य वृद्धिंगत होण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमांचा आढावा घेणे.
४. किशोरवयीन मुलांच्या सर्वांगीण विकासातील महत्त्वपूर्ण घटकांचा आढावा घेणे.
५. जीवन कौशल्य वृद्धिंगत होण्यासाठी उपाय सूचविणे.

संशोधनाची गृहीतके

वैज्ञानिक पद्धतीने कोणत्या विषयाचा अभ्यास करावयाचा असल्यास संशोधकाला प्रथम त्या विषयासंबंधी काहीतरी पूर्वज्ञान असावे लागते. ह्या प्रारंभिक ज्ञानाच्या आधारे संशोधक आपल्या विषयासंबंधी कोणतेतरी सामान्य अनुमान अथवा सिद्धांत बांधतो. हे अनुमान पुढील संशोधनासाठी मार्गदर्शक ठरते. संशोधक आपले लक्ष वैविध्यपूर्ण व आवश्यक तथ्यावर केंद्रीत करतो. आपल्या संशोधनाची दिशा ठरवून त्यासंबंधी पुरावे गोळा करतो व अध्ययनाच्या शेवटच्या चरणात आपले पूर्व अनुमान खरे आहे अथवा नाही ह्याचा निष्कर्ष काढतो. गृहीतकृत्ये निर्मिती हे संशोधनाचे अंतिम लक्ष नव्हे हे गृहीतकृत्ये सिद्ध करण्यासाठीच अध्ययन करावयाचे नसते. सत्य कोणते हे संशोधकाचे अंतिम लक्ष आहे. सत्य हे वास्तविक तथ्यांच्या आधारे उपलब्ध होत असते, गृहीतकृत्याच्या आधारावर नव्हे. गृहीतकृत्ये ही मुख्य

विषयांवर किंवा समस्येवर लक्ष केंद्रीत करण्यास अध्ययनाची दिशा ठरविण्यास सहाय्यक ठरतात. त्यामुळेच संशोधक एका निश्चित दिशेने संशोधन करीत असतो. मग ते गृहीतकृत्ये सत्य निघेल किंवा असत्यही ठरू शकते.

प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी पुढीलप्रमाणे संशोधनाची गृहीतके निश्चित करण्यात आली होती.

१. हिंगोली जिल्ह्याचे भौगोलिक वैशिष्ट्ये, क्षेत्रफळ, लोकसंख्या, साक्षरता, लिंग गुणोत्तर, ऐतिहासिक वारसा इत्यादी घटक महत्त्वपूर्ण आहेत.
२. जीवन कौशल्य कृती कार्यक्रमांची संकल्पना विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रेरणादायी आहे.
३. शालेय पातळीवर किशोवयीन मुलांमध्ये जीवन कौशल्य वृद्धिंगत होण्यासाठी विविक कृती कार्यक्रम राबविले जातात.
४. जीवन कौशल्य कृती कार्यक्रमांमुळे किशोरवयीन मुलांमध्ये जाणीव जागृती, चरित्रसुद्धता आणि सद्‌सद्‌विवेकबुद्धीत सकारात्मक परिणाम घडून येतो.
५. किशोरवयीन मुलांमध्ये जीवन कौशल्य वृद्धिंगत होण्यासाठी माहिती तंत्रज्ञान आणि आधुनिकीकरणाला मूल्य शिक्षणाची जोड देणे महत्त्वाचे आहे.

संशोधन पद्धती

संशोधन हा इंग्रजी भाषेतील Research या शब्दाचा पर्यायी शब्द आहे. इंग्रजी शब्दकोषापासून “संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान शाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्त्वे यांचे पुन्हा-पुन्हा परीक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास होय.” प्रत्येक अध्ययन विषयात ज्या संकल्पना, सिद्धांत, निष्कर्ष स्वीकृत झालेले आहेत. त्यांचे प्रामाण्य पुन्हा-पुन्हा तपासून पाहणे हे

त्या अध्ययन विषयांच्या अभ्यासकांचे कार्य आहे. जे सिद्धांत विभिन्न शास्त्रात प्रस्थापित झालेले आहेत. त्याची विश्वासार्हता तपासून पाहणे हे संशोधकाचे कार्य आहे. संशोधनामुळे मान्य झालेल्या नवीन तथ्यांच्या आधारावर प्रस्थापित ठरलेल्या सिद्धांतांत काही बदल करण्याची आवश्यकता स्पष्ट झाली, तर अशा सिद्धांताची नव्याने मांडणी करण्यासाठी संशोधनाची गरज पडते.

संशोधनाचे प्रामुख्याने व्यावहारिक संशोधन, क्रियात्मक संशोधन आणि मूलभूत सशोधन असे तीन प्रकार पडतात. व्याहारिक संशोधनातून जे निष्कर्ष समोर येतात त्यांचा उपयोग समाजाचे कल्याण करण्यासाठी होत असतो. हे संशोधन प्रामुख्याने सामाजिक जीवनाच्या व्यवहाराशी संबधित असते. क्रियात्मक संशोधन आणि व्यावहारिक संशोधन हे परस्पराशी पूरक आहे. क्रियात्मक संशोधनाचा मुख्य उद्देश वर्तमान परिस्थितीमध्ये सुधारणा करण्याचा असतो. उदा.वांशिक तणाव, गलिच्छ वस्ती सुधार, पूर्वग्रह किंवा प्रशासकीय व्यवस्थेतील परिवर्तन, स्त्रीवादांच्या समस्या यांच्याशी संबंधित असते. तर मूलभूत संशोधनात एखादी घटना, विचार किंवा समाजात उद्‌भवलेल्या समस्याचे कारण शोधले जाते. या संशोधनात समस्येचे निदान करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या उपाय योजना केल्या जात नाहीत. या संशोधन पद्धतीला गुणात्मक संशोधन असे म्हटले जाते. मूलभूत संशोधन हे अमूर्त किंवा चल घटकांशी संबंधित असल्यामुळे त्यांच्यामध्ये स्थलकालपरत्वे बदल होत असतात. त्यामुळे प्रस्तुत संशोधनाचा विषय व्यष्टी (Case) किंवा मूलभूत अध्ययनाशी संबंधित असल्यामुळे ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक या संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन पद्धती

तथ्य संकलनाचे स्त्रोत

- **प्राथमिक तथ्य संकलन**
  - प्रत्यक्ष निरीक्षण
  - प्रश्नावली
  - मुलाखती
  - अनुसूची
  - विशिष्टाभ्यास
- **द्वितीय तथ्य संकलन**
  - **अ.व्यक्तीगत कागदपत्रे**
    - आत्मचरित्रे
    - रोजनिशी
    - पत्रे
    - संस्मरण
  - **ब.सार्वजनिक कागदपत्रे**
    - शासकीय अहवाल/प्रकाशने
    - खाजगीसंस्थाचे अहवाल/प्रकाशने
    - वर्तमानपत्रे/मासिके/पुस्तके
    - ऐतिहासिक कागदपत्रे

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलन करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोताचा अवलंब करण्यात येईल. प्राथमिक स्त्रोतांमध्ये प्रश्नावली व अनुसूचि तर द्वितीय स्त्रोतांमध्ये प्रकाशित ग्रंथ, अनुवादीत ग्रंथ साहित्य, शासकीय व खाजगी संस्थाचे अहवाल, वर्तमानपत्रे, शोधप्रबंध, नियतकालीके, मासिके, त्रैमासिके, इंटरनेट इत्यादी दुय्यम साधनाचा उपयोग करण्यात येईल.

नमुना निवड पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी हिंगोली जिल्ह्याचे कार्यक्षेत्र निश्चित केले आहे. प्रश्नावली भरून घेण्यासाठी यादृच्छीक नमुना निवड पद्धतीतील लॉटरी पद्धतीने हिंगोली जिल्ह्यातील ३०० उत्तर दात्याची निवड करण्यात येईल. तसेच प्राथमिक साधन सामुग्रीचा अभ्यास करीत असताना वेगवेगळ्या सांखिकीय साधनांचा उपयोग सुद्धा करण्यात येईल.

संशोधनाची मर्यादा

संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे संशोधन सुरू होण्यापूर्वी संशोधनाची निश्चित मर्यादा ठरविणे आवश्यक असते. ज्याप्रमाणे अवकाशात विमानाला निश्चित दिशा दाखविण्याचे काम होकायंत्र करीत असते त्याचप्रमाणे संशोधनाला निश्चित आकार प्राप्त होण्यासाठी संशोधनाला मर्यादा असणे आवश्यक असते. प्रस्तुत संशोधन हिंगोली जिल्ह्या पुरते मर्यादीत असून ही या संशोधनाची मर्यादा आहे. अपवादात्मक परिस्थितीमध्ये इतर ही संदर्भ येऊ शकतात.

संशोधन आराखडा

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे : हिंगोली जिल्ह्याची ओळख

प्रकरण चौथे : जीवन कौशल्याची संकल्पना

प्रकरण पाचवे : प्रस्तुत माहितीचे विश्लेषण किंवा अर्थनिर्वचन

प्रकरण सहावे : सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भग्रंथ

१. जीवन कौशल हेतु पाठ्यक्रम, विश्वविद्यालय अनुदान आयोग बहादुर शाह जफर मार्ग, नई दिल्ली

२. जीवन कौशल्ये शिक्षण मार्गदर्शिका भाग १ व २, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

३. व्ही.बी.पाटील, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, प्रथमावृत्ती २०१२

४. ए.एन.भक्कड, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०१२

५. रा.ना.घाटोले, सामाजिक संशोधन पध्दती

६. पी.एल.भांडारकर, सामाजिक संशोधन पध्दती, हिमालय पब्लिकेशन हाऊस, दिल्ली, प्रथमावृत्ती १९९४

७. गुरुनाथ नाडगोडे, सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर २००१

८. प्रा.एस.डी.दराडे, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती २०१३

९. प्रदिप आगलावे, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

१०. Kothan C.R., Research Methodology, Methods and Techaigues, New Delhi, Age International Publisher. २००६

११. www.wikipedia.org

१२. http://www.unicef.org/lifeskills/index_whichskills.html

संशोधक विद्यार्थी

अविनाश रंगनाथ देसाई

संशोधक मार्गदर्शक

डॉ. केशव वा. इंगोले
एम.कॉम., एम.ए., (इंग्रजी, मराठी, इतिहास)
एम.एड., सेट, पीएच.डी., एल.एल.बी., एम.बी.ए.
प्राचार्य, राष्ट्रमाता अध्यापक विद्यालय, लोहा
ता. लोहा जि. नांदेड